अखिल भारतीय सेवेतील, राज्यसेवेतील
तसेच सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे
इत्यादींच्या अधिकारी/पदाधिकारी
यांच्या परदेश दौ-याबाबत.

---

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक सीडीआर-१०९६/८७/प्र.क्र.४/९६/अकरा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- २४ ऑक्टोबर, १९९६.

वाचा:- १] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९६/८७/प्र.क्र.४/९६/११, दि.६ एप्रिल, १९९६.

शासन परिपत्रक :-

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९६/८७/प्र.क्र.४/९६/११, दिनांक ६ एप्रिल, १९९६ अन्वये अखिल भारतीय सेवेतील/राज्य सेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रम, महामंडळे इत्यादींचे अधिकारी/पदाधिकारी यांच्या परदेश दौ-याबाबत अवलंबावयाच्या कार्यपध्दतीबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या परिपत्रकातील परिच्छेद ४[३] रद्द करून त्याऐवजी खालीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरण्यात यावी, असा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

"परदेश दौ-याचा प्रस्ताव शासन परिपत्रक दि.६.४.१९९६ नुसार तपासण्यात आल्यानंतर तो प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाने पाहिल्यानंतर संबंधित खात्याच्या मंत्री महोदयांना मान्यतेसाठी सादर करण्यात यावा व त्यांची मान्यता घेतल्यानंतर शिफारस समिती पुढे सादर करावा. शिफारस समिती त्या समितीच्या निष्कर्षासह सदरहू प्रस्ताव मा. मुख्यमंत्र्यांना सादर करील. त्यास शासनाची मान्यता मिळाल्यानंतर सदर परदेश दौ-यांना केंद्र शासनाची मान्यता मिळविण्याबाबतची कार्यवाही संबंधित विभागांनी करावी.

२] शासनाच्या असेही निदर्शनास आले आहे की, ब-याच वेळा विदेश दौ-याचे प्रस्ताव शिफारस समिती पुढे शेवटच्या क्षणाला सादर केले जातात व त्यामुळे संबंधितांची बैठक घेऊन त्यावर शासनाचे आदेश घेणे कठीण होऊन बसते. तरी या परिपत्रकाव्दारे अशा सूचना देण्यात येत आहेत की, विदेश दौ-याबाबतचे असे प्रस्ताव विदेश दौ-याच्या दिनांकापूर्वी कमीत-कमी १० दिवस आधी शिफारस

समिती समोर विचारार्थ सादर करण्यात यावेत. अन्यथा, उशीरा आलेले प्रस्ताव शिफारस समितीसमोर सादर करण्यात येणार नाहीत याची कृपया संबंधित विभागांनी xxxxxxxxxx नोंद घेऊन प्रस्ताव विहित मुदतीत सादर करण्याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[रा.द.कारार]
उप सचिव
सामान्य प्रशासन विभाग

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,/ उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
मुख्य सचिवांच्या कार्यालयातील उप सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
सामान्य प्रशासन विभाग/का.८, १०, १२-अ, १९, २०, २८-अ, ३४,
सर्व मंत्रालयीन विभाग [अधिक ५ प्रतींसह] सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती आहे की, त्यांनी वरील आदेश त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व सांविधिक संस्था, शासकीय तसेच निमशासकीय संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, मंडळे व महामंडळे यांच्या निदर्शनास आणून त्यांचे कटाक्षाने पालन करण्याबाबत सूचना द्याव्यात.